# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक ९ जुलै, २०२५**

## नगर विकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४७**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ७५, रूपये:- ४२,८९,२८,००,०००/-**<br>**श्री. अनिल मांगुळकर** |
| (१) | ८६० | १० | यवतमाळ नगरपरिषद हद्दीतील अनेक रस्ते चांगल्या स्थिती मध्ये असताना सुद्धा ज्या रस्त्यांना सिमेंट काँक्रेट करण्याची गरज नसताना सुद्धा त्या रस्त्यांवर रस्ते तयार करण्यात आले असणे, यवतमाळ नगरपालिका रस्त्यांना सिमेंट काँक्रेट करण्याबाबत निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (२) | ६७५ | १० | राज्यात सन २०१६ ते २०१७ ते २०२१-२०२२ या सहा वर्षाच्या कालावधीत सुमारे ३४ लाख टन कचरा प्रक्रियेविना उघडयावर टाकला गेला असल्याचे यंदाच्या मा. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य यांच्या अहवालातून समोर आले आहे, त्यामुळे राज्यातील लाखो नागरीकांच्या वाटयाला दुर्गंधी अनारोग्याचे जगणे आले आहे,,यामुळे शासनाने निर्णय घेऊन घनकचरा निर्मुलनासाठी धोरण आखणेबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ६८० | १० | महाड ( जि. रायगड ) येथील चवदार तळे सत्याग्रह व मनुस्मृती दहन दिनाच्या वर्धापनदिनी आंबेडकरी जनता लाखोंच्या संख्येने येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी येतात मात्र त्यांच्यासाठी महाडमध्ये कोणत्याही मुलभूत सुविधा नसल्याने त्यांना खूप गैरसोयी सहन कराव्या लागतात, याबाबत शासनाने दोन्ही वर्धापनादिनासाठी दरवर्षी अर्थसंकल्पात तरतूद करुन या तळाचे शुध्दकरण व येथील परिसराचे सुशोभिकरण करणेबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | ६९१ | १० | उमरेड नगरपरिषद, भिवापूर नगर पंचायत, कुही नगर पंचायत येथील पिण्याच्या पाण्यासाठी अमृत २.० साठी भरभोस निधि वितरीत करणे बाबत नगरविकास विभागाने तातडीने उपाययोजना करावी.शहरी भागतील रस्त्यांची दुरवस्था झालेली आहे,त्याबाबत स्थानिक नागरिकांनी अनेकदा चांगले दर्जेदार रस्ते, नाले, व्हावेत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | यासाठी सबंधित प्रशासनाकडे पाठपुरावा केला आहे, परंतु स्थानिक तिन्ही ही नगर पंचायत व नगरपरिषद यांची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने,राज्याच्या नगरविकास विभागाने सदर तिन्ही शहरातील सिमेंट कॉंक्रिट रस्त्यांना भरघोस निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे त्यामुळें शासनाने तातडीने उपाययोजना करून उमरेड नगर परिषद,भिवापूर नगर पंचायत, कुही नगरपंचायत यांना निधी वितरीत करण्याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ७८७ | १० | उमरेड नगरपरिषद येथील पाणी पुरवठा योजनेसाठी अमृत योजनेच्या माध्यमातून शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा तसेच माझ्या उमरेड मतदार संघातील कुही नगर पंचायत व भिवापूर नगर पंचायत येथील पाणी पुरवठा योजनेसाठी अमृत योजनेच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ७८८ | १० | उमरेड नगर परिषद हद्दीत एक ऐतिहासिक गाव तलाव आहे, त्या ठिकाणी नागरिक मोठ्या संख्येने फेरफटका मारण्यासाठी येतात.परंतु सदर ठिकाणी कोणत्याही सोईसुविधा नाहीत त्यासाठी संबंधित नगरपंचायत प्रशासनाकडे विचारले असता त्यांच्याकडे त्या ठिकाणी चांगल्या दर्जाच्या सुविधा उपलब्ध करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध नाही तसेच नगरपरिषद यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या प्राथमिक सुविधा नाहीत हे वास्तव आहे,त्यामुळे उमरेड गाव तलावाचे संरक्षण व जतन करण्यासाठी मुंबई चौपाटी किंवा कोल्हापूर रंकाळा तलावाच्या धर्तीवर विकास करण्यासाठी, नागरिकांना चालण्यासाठी विशेष ट्रॅक बसण्याची व्यवस्था, स्ट्रीट लाईन व्यवस्था करण्यात यावी यासाठी सदर उमरेड नगरपरिषदेला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ७९० | १० | उमरेड नगरपरिषद हद्दीत एक ऐतिहासिक गाव तलाव आहे,त्या ठिकाणी नागरिक मोठ्या संख्येने फेरफटका मारण्यासाठी येतात.तसेच पावसाळयात पाणी असल्याने सदर तलाव संपूर्ण भरत असतो, त्या तलावात विविध रंगबेरंगी पक्षी जलविहार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात येत असतात, या मध्ये परदेशी पक्षी सुद्धा असतात त्यामुळे तेथील नयनरम्य वातावरण पाहण्यासाठी पक्षी प्रेमी, तसेच शहरातील नागरिक मोठ्या प्रमाणात येत असतात. परंतु सदर तलावात आता कोणीतरी खोडसाळपणा करून संपूर्ण तलाव परिसरात मोठ्या वाहनातून माती आणून सदर तलाव बुजवण्याचा प्रयत्न केला असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे वेळीच सदर नगरपरिषदेला मी सदर गैर प्रकार लक्षात आणून दिल्यावर त्या ठिकाणी कारवाई केली. परंतु ही बाब अत्यंत गंभीर असून सदर जुना तलाव मातीने बुजविण्याच प्रकारामुळे पावसाळ्यात शहरातील नागरीवस्ती मध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले जाऊन नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | निर्माण होत असणे, उमरेड गाव तलावाचे संरक्षण व जतन करण्यासाठी निधीची तरतूद कराण्याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ७९१ | १० | उमरेड ता. भिवापूर नगरपंचायत हद्दीतील गुजर तलाव ऐतिहासिक गाव तलाव असणे, सदर तलाव परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिक फेरफटका मारण्यासाठी येत असणे, तसेच सदर तलावात पावसाळयात पाणी असल्याने विविध पक्षी येतात तसेच मोठ्या प्रमाणात जलचर प्राणी सध्या निर्माण होणे, त्यामुळे त्या भागात नागरिक पर्यटक मोठ्या प्रमाणात येणे, परंतु मागील माहे जून, महिन्यात सदर तलावात पाणी कमी असल्याने किंव्हा इतर कारणामुळे मोठ्या प्रमाणात मासे मृत आढळून येणे, तसेच सदर तलावात मृत माशांचा खच पडला होता, त्यामुळे संपूर्ण परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली होती त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असणे, भिवापूर नगरपंचायत प्रशासनाकडे सदर तलावाच्या सुशोभन करण्यासाठी व जतन व संवर्धन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (९) | ७९३ | १० | ओर्लेम मालाड (प.) येथील कार्डिनल ग्रेशियस उद्यानाची अत्यंत दुरावस्था झालेली असणे. उद्यानाची डागडूजी, सुशोभीकरण व पुनर्बांधणी करण्याची गरज निर्माण झालेली असणे, मैदानाची पुनर्बांधणी करण्यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ७९४ | १० | सोमवार बाजार, मालाड पश्चिम, मुंबई येथील नानाभाई भुलेश्वर रोड ते सॉलिडरी बिल्डींग या सी. सी. रोडचे काम सुरू असणे, सदरच्या रस्त्याच्या कामा समवेत पथ दिवे लावणे आवश्यक असणे. पथ दिव्या अभावी स्थानिक नागरिकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत असणे, पथदिवे बसविण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ७९५ | १० | ओल्ड फेरी रोड (पाटीलवाडी ते मढ जेट्टी) येथील रस्त्याची अत्यंत दुर्दशा झालेली असणे, नवीन रस्ता बनवून मिळावा अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून वारंवार केली जाणे, रस्ता रोड लाईन प्रमाणे रूंदीकरण करून विकसित करण्याच्या दृष्टीने करण्याची गरज निर्माण झालेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ७९६ | १० | मालाड-मार्वे रोड (अथर्व कॉलेजसमोरील चारकोप जंक्शन) पासून प्रस्तावित रायन इंटरनॅशनल स्कूल पुलाला जोडणारा एम.डी.पी. रोडपर्यंत अतिरिक्त जोड रोड बांधकाम करण्याची गरज निर्माण झालेली असणे, तसेच अस्तित्वात असलेल्या मालाड-मार्वे रस्त्याच्या एका बाजूला ९.१५ मीटर रुंदीचा अतिरिक्त आरएल तयार करण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, सध्या मालवणी परिसरात चारकोप |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | जंक्शन येथे वाहतुकीची गंभीर समस्या निर्माण झालेली असणे, ज्यामुळे या भागात वाहतूक कोंडी निर्माण होणे. शिवाय, प्रवाशांची संख्या वाढविण्यासाठी आणि वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रस्तावित पुलाच्या कामांमुळे भविष्यातील वाहतुकीचा प्रवाह लक्षात घेऊन मालाड-मार्वे रोड ते रायन इंटरनॅशनल स्कूल पुलाला जोडणारा एम.डी.पी. रोडपर्यंत अतिरिक्त जोड मार्ग ९.१५ मीटर लांबीचा पूल बांधणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ७९७ | १० | मामलतदारवाडी रोड क्रमांक ६, मालाड (प.) या रस्त्याच्या रुंदीकरणाचा प्रश्न रखडलेला असणे, द नील अपार्टमेंट सीएचएस आयटीडी नावाची सोसायटी माहे मे, २०१३ रोजी पाडण्यात आलेली असणे, सोसायटीतील सर्व सदस्यांसह सोसायटीतील कुटुंबे इमारत पाडल्यापासून बेघर असणे, दरम्यान, सध्याच्या रस्त्याची रुंदी ६ मीटरपेक्षा कमी असल्याने ते सोसायटीचा पुनर्विकास करू शकत नसणे, मामलतदारवाडी रोड क्रमांक ६ या रस्त्याची रुंदी ९.१५ मीटर करण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, जेणेकरून पुनर्विकास प्रकल्प सुरू होईल लोकांना त्यांची योग्य घरे नवीन इमारतीत मिळण्यास मदत होईल, रस्तारुंदीकरण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | ७९८ | १० | मालाड पश्चिम मार्वे मार्ग आणि लींक मार्गावरी मीठ चौकी जंक्शन येथील वाहतूकीचा ताण कमी करण्यासाठी मीठ चौकी येथे उड्डाणपुलाची निर्मिती करण्यात आलेली असणे. या उड्डाणपुला वरून प्रतिदिन लाखोंच्या संख्येने वाहनांची ये-जा असणे. मालाड-पश्चिम येथील अत्यंत महत्त्वाच्या ह्या जंक्शनवर बांधण्यात आलेल्या या उड्डाणपुलाखाली आजतागायत सुशोभीकरणाचा विचार झालेला नसणे. मुंबई शहर व उपनगरात सौंदर्य दृष्टीकोनातून अनेक उड्डाणपूलांखाली सुशोभीकरण करण्यात आलेले असणे, त्याच धर्तीवर मीठ चौकी उड्डाणपूलाखाली देखील सुशोभीकरण करण्यात यावे, उड्डाणपुलाच्या खालील भागाचे सुशोभीकरण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | ७९९ | १० | मालाड पश्चिम येथील लॉर्डेस कॉलनी ते रसगौतम बुद्ध लेनला जोडणारा ९.१५ मीटर रुंद डीपी रोड असणे, सदर रस्ता सध्या बांधकाम सुरु असलेल्या ऑरोला सीएचएस च्या ताब्यात असणे, गौतम बुद्ध लेनकडे जाण्याकरीता लॉर्डेस कॉलनीच्या परिसरात राहणाऱ्या स्थानिक लोकांना मार्वे रोडवरून प्रवास करावा लागत असणे, नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता लॉर्डेस कॉलनी ते आरएल पर्यंतचा ९.१५ मीटरचा रस्ता दुरुस्त व रुंद करण्याची गरज निर्माण झालेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१६) | ८३४ | १० | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शैक्षणिक दर्जा खालावलेला असणे, मुलभूत सुविधांचा अभाव असणे, असंख्य विद्यार्थ्यांचे पालक आपल्या मुला-मुलींचा प्रवेश खाजगी शाळांमध्ये करणे, विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी भाषा सक्तिची करण्याची गरज निर्माण झालेली असणे, इंग्रजी ही जागतिक संवादाची भाषा असणे, इंग्रजी भाषा न आल्यामुळे विद्यार्थ्यांच्या करिअरच्या संधी कमी होणे, पण त्यासोबतच मातृ भाषेचेही अनन्यसाधारण महत्त्व असणे, इंग्रजी भाषा व मराठी भाषा महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये सक्तीची करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.<br><br>**पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ७६, रूपये:- २,२६,०००/-**<br>**श्री. वरुण सरदेसाई** |
| (१७) | ८३७ | १०० | वांद्रे (पूर्व) येथे पश्चिम द्रुतगती महामार्गावर विविध ठिकाणी असलेल्या सर्विस रोड वर दिशादर्शक फलक लावण्याची आवश्यकता, एच पूर्व विभागामधील विविध अंतर्गत रस्त्यांवर माहितीचे फलक लावण्याची आवश्यकता, बृहन्मुंबई महानगरपालीकेच्या एच पूर्व विभागाकडून नागरिकांकरिता राबविण्यात येणाऱ्या विविध योजना यांची माहिती होण्याकरिता प्रसिद्धी करण्याची आवश्यकता, बृहन्मुंबई महानगरपालीकेच्या एच पूर्व विभागाकडून नागरिकांना क्षेत्रामध्ये असलेल्या म्हाडा कार्यालय, एस.आर.ए. कार्यालय, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालय, वांद्रे कुर्ला संकुल ई. महत्वाच्या कार्यालयांची माहिती होण्याकरिता दिशादर्शक फलक व प्रसिद्धी करणेबाबतची आवश्यकता याबाबत जाहिरात व प्रसिद्धी खर्चासाठी केलेल्या तरतुदी अंतर्गत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.<br><br>**पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ८१, रूपये:- ९,८९,००,००,०००/-**<br>**श्री. अनिल मांगुळकर** |
| (१८) | ८६२ | १० | यवतमाळ शहरात २४ तास पाणीपुरवठा झाला पाहिजे, यवतमाळ करांना पाणी मिळाले पाहिजे त्यासाठी अमृत पाणी पुरवठा योजना सरकारने आणली परंतु त्याच योजनेसोबत शहरात आता अंडरग्राउंड ड्रेनेज सिस्टिम चे काम चालू असणे, त्या योजनेमुळे शहरातील पुन्हा नवीन झालेले रस्ते फोडण्यात येत आहे. पूर्ण शहर पावसाळी परिस्थिती मध्ये चिखलमय झाले असणे, यवतमाळ नगरपालिका यांना निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१९) | ८२८ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही व सावली नगरपंचायत अंतर्गत शहरातील अनेक प्रभागात नागरी सुविधाचे विकासकामे निधी अभावी करण्यासाठी अडचणी निर्माण होत असणे, चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही व सावली नगरपंचायत अंतर्गत सर्व प्रभागामध्ये नागरी सुविधाचे विकास कामे करण्यासाठी तसेच सिंदेवाही व सावली नगरपंचायत या दोन्ही नगरपंचायतीला निधीची आवश्यकता असल्याने नव्याने स्थापन केलेल्या नगरपालीका/नगरपरिषदांना नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय कार्यक्रम या योजनेअंतर्गत सदर निधी मंजूर करून सिंदेवाही व सावली नगरपंचायतला उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | ८२९ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषदेअंतर्गत शहरातील अनेक प्रभागात नागरी सुविधाचे विकासकामे निधी अभावी करण्यासाठी अडचणी निर्माण होत असणे, चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषदे अंतर्गत सर्व प्रभागामध्ये नागरी सुविधाचे विकास कामे करण्यासाठी निधीची आवश्यकता असल्याने नगरपालीका/नगरपरिषदांना त्यांच्या नव्याने विस्तारलेल्या सीमाक्षेत्रामध्ये नागरीसुविधा पुरविण्यासाठी सहाय या योजनेअंतर्गत सदर निधी मंजूर करून ब्रम्हपूरी नगरपरिषदेला उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | ८३० | १० | सर्वत्र संगणीकरणावर भर देण्यात येत असून पेपरलेस कामे करण्यावर शासनाचा भर असणे, मात्र चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी नगरपरिषदमध्ये संगणका अभावी अनेक कामे कागदावरच करण्यात येणे, यात नागरिकांच्या तक्रारी, शासनाच्या अनेक योजना यासह इतर कामे हे कागदावरच करण्यात येणे, त्यामुळे ब्रम्हपूरी नगरपरिषदेतील सर्व कामे पेपरलेस करण्यासाठी सर्व विभागात संगणकाची आवश्यकता असल्याने हे संगणक खरेदी करण्यासाठी नगरपरिषदेकडे निधी उपलब्ध नसल्याने सदर संगणक खरेदी करता न येणे, त्यामुळे चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषदेचे सर्व कामकाज पेपरलेस करण्यासाठी संगणक खरेदी करण्यासाठी राज्यातील नगरपरिषदांना संगणकीकरणासाठी अनुदान कार्यक्रम या योजने अतंर्गत निधी उपलब्ध करुन मिळणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१७, नगरविकासावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ८८, रूपये:- १५,००,००,००,०००/-**<br>**श्री. अजय चौधरी** |
| (२२) | ७१५ | १०० | मुंबई शहरातील शिवडी मतदार संघामध्ये अभ्युदयनगर वसाहतीत इमारत क्र.११ शेजारी भूखंडावर आरोग्य केंद्र होते परंतु सदरील आरोग्य केंद्र धोकादायक झाल्याने तोडण्यात येणे, सदर भूखंड म्हाडाकडून लवकरात लवकर महानगरपालिकेस हस्तांतरण करून महानगरपालिकेच्यावतीने आरोग्य केंद्र बांधण्यात यावे, अशा सूचना शासनाने महानगरपालिकेस तातडीने द्याव्यात, जेणे करून अभ्युदयनगर परिसरातील लोकांना आरोग्य सुविधा उपलब्ध होईल, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | ७१६ | १०० | मुंबईतील उद्यानांची निधीअभावी दुरावस्था असून ज्येष्ठ नागरिकांकरिता प्रसाधनगृह व पिण्याच्या पाण्याची सोय नाही, अनेक उद्याने दुरुस्तीच्या प्रतिक्षेत असणे, फ/दक्षिण विभागातील ३० ते ३५ उद्यांनाच्या दुरुस्तीकरिता मागील २-३ वर्षामध्ये ६० ते ७० लाख इतका तुटपुंजा निधी देण्यात येणे, सदर निधी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात भांडवली खर्चामध्ये तरतूद केल्याने अधिकचा कर भरावा लागणे,व त्यामुळे दुरुस्तीच्या कामाकरिता निधी अपुरा पडणे, त्यामुळे उद्यांनाच्या दुरुस्तीचा दर्जा रहात नसणे, फ/दक्षिण मधील उद्यान दुरुस्ती करिता महापालिका अर्थसंकल्पामध्ये पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने उद्यानामधील नागरी सुविधा नसणे, त्याकरीता फ/दक्षिण विभागास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२४) | ७१७ | १०० | परळ येथील बारादेवी येथे प्राचीन हिंदू देवता शिव रूपातील मुर्ती असून सदर मुर्ती परळ येथे रस्ता बांधकाम करित असताना सन १९३१ मध्ये सापडली असणे, शिवाची मुर्ती जवळच्या बारादेवी मंदिरात हलविण्यात आली, तेव्हापासून प्राचीन मुर्ती बारादेवी मंदिर येथे स्वतंत्र खोलीत ठेवण्यात आली आहे. सदर प्राचीन मुर्ती इ.स.५व्या किंवा ६व्या शतकाच्या उत्तरार्धातील असल्याबाबत भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने प्रमाणित केले आहे. सदर मुर्तीमध्ये शिवाचे ७ रूप दर्शविण्यात आले आहे. मध्यवर्ती प्रतिमेभोवती ६ शिव प्रतिमा आहेत. प्राचीन मुर्तीची सप्तमूर्ती रचना आहे. प्राचीन मुर्तीची उंची सुमारे ३ ते ३.५ मीटर इतकी आहे. बारादेवी प्राचीन मुर्तीचे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने सन १९८५ मध्ये राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले आहे. आंतरराष्ट्रीय पुरातत्व संस्थेने देखील परळ येथील प्राचीन मुर्तीस ऐतिहासिक वारसेचा दर्जा देवून आंतरराष्ट्रीय वारसा म्हणून संरक्षित केला आहे. प्राचीन शिवमुर्ती असलेल्या परिसराचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास करून पर्यटनाचा दर्जा देणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे मुंबईतील आंतरराष्ट्रीय |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | व राष्ट्रीय ऐतिहासिक संरक्षित वारसा म्हणून दुर्लक्षित प्राचीन मुर्ती पर्यटकांना पाहता येईल तसेच मुंबईच्या पर्यटनात भर पडण्यास मदत होईल. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय देरकर** |
| (२५) | ८४२ | १०० | वणी येथील वणी नगरपरिषद क्षेत्रातील अत्यंत रहदारीचे व शहराला जोडणारे महत्वाचे रस्ते वैशिष्ट्य पूर्ण योजनेतून मंजूर करण्याबाबत मा.मंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केलेली असणे, परंतु अद्यापही सदर कामांना मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन दिलेला नसणे, नगरपरिषद क्षेत्रातील दिपक चौपाटी ते आय.टी.आय. पर्यंत सिमेंट काँक्रीट करणे, पंचशिल नगर ते ब्राम्हणी फाटा पर्यंत रस्ता सिमेंट क्राँक्रिट करणे तसेच सतीघाट ते धोन्सा चौपाटी रस्ता सिमेंट काँक्रीट करणे या कामांकरीता आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (२६) | ७४७ | १० | सांगोला येथे वाढते नागरिकीकरण व शहरीकरण झाल्याने येथील नागरिकांना पायाभूत, मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच भूमिगत गटारे, रस्ते करण्याकरिता सांगोला येथील नगर परिषदांना वैशिष्टपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (२७) | ७३८ | १०० | सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर नगरपरिषद येथील रस्ता व तदअनुषंगिक विकास करण्याच्या कामांसाठी "विशेष रस्ता अनुदान" कामाकरिता रु. २,५८,००,०००/- चा निधी वितरित करण्यास शासन निर्णय दिनांक १९ एप्रिल,२०२२ रोजीन्वये नगरविकास विभागाने मंजुरी देणे, सदर कामांना अद्यापी मंजूरी निधी प्राप्त न होणे, सदर कामाकरिता मंजूर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२८) | ७३९ | १०० | इस्लामपूर व आष्टा नगरपरिषदांसाठी सन २०२२ मध्ये एकूण २३ कामे मंजूर होणे, सदर कामाची किंमत रु.३८५ लाख इतकी असणे, सदर कामापैकी १९ कामे पूर्ण होणे, सदर पूर्ण झालेल्या कामासाठी शासनाने फक्त १० टक्के निधी उपलब्ध करुन देणे, दिनांक १९ एप्रिल,२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर झालेल्या कामांना तात्काळ उर्वरीत निधी उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. रोहित पाटील** |
| (२९) | ८५३ | १०० | तासगाव नगरपालिका क्षेत्रात काही वर्षांपूर्वी २४ तास पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नवीन मीटर बसवण्यासाठी टेंडर काढण्यात आले असणे, या योजनेत नागरिकांकडून प्रत्येकी सहा ते सात हजार रुपयांची रक्कम घेऊन नळजोडणी व मीटर बसविण्यात आले असणे. मात्र मीटरच्या गुणवत्तेबाबत आणि त्याच्या किमतीबाबत स्थानिक लोकप्रतीनिधींनी आक्षेप नोंदवले असणे, संपूर्ण योजनेशी संबंधित निवेदे पासून ते नळजोडणीपर्यंत एकही अधिकृत कागदपत्र सध्या नगरपालिका कार्यालयात उपलब्ध नसणे, नागरिकांनी भरलेली रक्कम कुठे आणि कशासाठी खर्च झाली याचा ठोस लेखाजोखा अद्याप उपलब्ध नाही. या नवीन जोडणीद्वारे नागरिकांना आवश्यक त्या दाबाने पाणीपुरवठा देखील होत नसल्याने ही संपूर्ण योजना अकार्यक्षम आणि संशयास्पद ठरत असणे, तासगाव नगरपालिका क्षेत्रात काही वर्षांपूर्वी २४ तास पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नवीन मीटर बसवण्याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (३०) | ६९६ | १० | मुंबईतील रस्ते खडेमुक्त करण्यासाठी मुंबई महापालिका प्रशासनाने ६ हजार कोटीच्या निविदा काढून अद्यापपर्यंत मुंबईतील २ हजार किलोमीटर रस्त्यापैकी ४०० किलोमीटर रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरणाचे कामे पुर्ण झाले नसल्याचा प्रकार दि.२२.०६.२०२५ रोजी निर्दशसनास येणे, सदरहू कामाचे जानेवारी, २०२३ मध्ये कार्यादेश देण्यात येणे, ही कामे पुर्ण झालेली नसतानाच दुसऱ्या टप्यातील कामांसाठी ऑगस्ट, २०२४ मध्ये निविदा मागवून कार्यादेश देण्यात येणे, पहिल्या टप्यातील अर्धवट कामे आणि दुसऱ्या टप्यातील नविन कामे एकत्रित सुरु करणे, कामाच्या योग्य नियोजना अभावी प्रशासकीय अधिकारी व ठेकेदारांच्या हलगर्जीपणामुळे जुन, २०२५ अखेरपर्यंत कॉंक्रीटीकरणाची कामे पुर्ण न होणे, सध्या मुंबईत ७१४ रस्त्याचे कॉंक्रीटीकरणाचे काम अर्धवट झाली असून यातील काही रस्त्याची काहीची ५० टक्के तर काहींची २० ते ३० टक्के कामे बाकी असणे, पावसाळा सुरु झाल्याने महापालिकेकडून खड्डे पडून पाणी साचू नये या नावाखाली, डांबर टाकून तात्पुरता मुलावा करण्याच्या कामात देखील निकृष्ठ कामे करुन अर्थिक गैरव्यवहार करण्यात येणे, अर्धवट कामामुळे नागरिकांची रहदारीसाठी झालेली प्रचंड गैरसोय, याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३१) | ६९७ | १० | मुंबईतील गोरेगाव ते पालघर मिरा भाईदंर ते वाफी दरम्यानच्या गरीब आदिवासी, मध्यमवर्गीयांना अत्यंत कमी दरात उपचार रुग्ण सेवा उपलब्ध करुन देणारे, बोरीवली (प). येथील मुंबई महानगरपालिकेचे श्री. हिरालाल भगवती रुग्णालयाचे मुंबई महापालिका प्रशासनाने खाजगीकरण करण्याचा दि.२५.०३.२०२५ रोजी घेतलेला धक्कादायक निर्णय, सदरहू भगवती रुग्णालयाचे पीपीपी तत्वावर प्रचलन आणि परिरक्षण करण्याचे पालिका आयुक्तांनी अर्थसंकल्पाद्वारे जाहिर करण्यात |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | येणे, त्यानुसार १० मार्च, २०२५ रोजी निविदा काढून भगवती रुग्णालयाचे खाजगीकरण करण्यात येत असल्याचा प्रकार उघडकीस येणे, सदरहू ठिकाणी ९ मजल्याचे ४९० खाटांचे रुग्णालय बांधण्यात येत असून निविदेनुसार १४७ खाटा मुंबई शहर आणि उपनगरातील पिवळया तसेच भगव्या रेशन कार्ड धारक, महापालिका कर्मचारी, नगरसेवक आणि कुटुंबीय यांना निश्चित दराने रुग्ण सेवा उपलब्ध असणे, परंतू इतर रुग्णांना खाजगी रुग्णालयाप्रमाणे विनामुल्य किंवा कमी दरात रुग्णांना उपचार मिळू शकणार नसणे, सदरहू रुग्णालयाच्या नुतणीकरण व अद्यावतीकरणास २००९ मध्ये ३२० कोटी रुपये मंजूर होऊनही अद्याप रुग्णालयाचे काम पुर्ण न होणे, रुग्णालयाच्या खाजगीकरणास तीव्र विरोध दर्शवून यांसदर्भात, मुंबई पश्चिम उपनगरातील सर्व लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दि.२४.०३.२०२५ रोजी देखील निवेदन देवूनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३२) | ६९८ | १० | मुंबईतील कुर्ला, ओशिवरा, कांदरपाडा, दहिसर, माहिम, मरोळ मरोशी, यारी रोड आदी सहा बस आगार व स्थानकांचा बेस्ट उपक्रमातर्फे खाजगी विकासकामार्फत करण्यात आलेल्या पुर्नविकास प्रकल्पात चार विकासकांनी १६० कोटी रुपये थकीत रक्कम बेस्ट उपक्रमास न देता, त्याचबरोबर कांदरपाडा बसस्थानक दहिसर पश्चिम येथील बस आगार पुर्नविकास प्रकल्पातील बेस्ट उपक्रमाची ११८१.६४ चौ.मी. क्षेत्रफळाची जागा अद्यापही विनित इस्टेट प्रा.लि.कंपनीच्या विकासकाने बेस्ट उपक्रमाला हस्तांतरित न करता फसवणूक करणे, आधीच बेस्ट उपक्रम तोटयात असतांना व त्यास मुंबई महापालिकेकडून अर्थसहाय्य देवूनही निधी कमी पडत असतांना नुकतीच बेस्ट उपक्रमाने तोटा भरुन काढण्यासाठी किमान ६ रुपयावरून १२ रुपये एसी बसचे भाडे करण्यात येणे, असे असतांनाही बेस्ट उपक्रमाच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी विकासकाकडून थकीत रक्कम वसूल न करता उपक्रमाचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान करणे, या संदर्भात पर्यावरण प्रेमी ॲड.राजेश दाभोळकर यांनी मा. मुख्यमंत्री, मा. सचिव, नगरविकास, मा.महाव्यवस्थापक बेस्ट यांना ०९.०६.२०२५ लेखी तक्रार निवेदन देवूनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३३) | ६९९ | १० | "मुंबईतील अंधेरी (पूर्व) व सबवे कडील अंतरराष्ट्रीय विमानतळ दरम्यान अरुंद मोगरा नाल्यामुळे पावसाळ्यात पाणी भरून मोठ्या प्रमाणात नागरिकांची व वाहन चालकांना रहदारी करण्यास प्रचंड गैरसोय होत असल्याची बाब दि.१७.०६.२०२५ रोजी निदर्शनास येणे, सदरहू प्रश्न सोडविण्यासाठी वर्सोवा येथील शुटींग ब्रीज ते मिल्लत नगर येथील मोगरा नाल्याची रुंदी वाढवून संरक्षण भींत बांधण्याकरिता लोकप्रतिनिधींनी महापालिका आयुक्त व अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प) यांना दि.१२.०८.२०२४ रोजी व त्यानंतर दि.०४.०२.२०२५ रोजी स्मरण पत्र |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | देऊनही अद्याप यावर शासन तथा महापालिकेकडून कोणती कार्यवाही करण्यात न येणे, चितळे समितीच्या अहवालानुसार सन २००५ साली अतिवृष्टीनंतर ब्रीमस्ट्रोवॅड प्रकल्पात नाल्याच्या रुंदीकरणाचे काम प्रस्तावित असतानाही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही न होणे, जनतेच्या हिताच्या दृष्टीने नाल्याचे रुंदीकरण करणे व संरक्षण भिंत बांधणे हि महत्वाची बाब प्रस्तावित केली असतानाही त्यास प्राधान्यक्रम देऊन महापालिकेतर्फे निधी उपलब्ध करुन न देणे, सिमेंट काँक्रीकटीकरणासाठी १०० कोटीहून अधिक निधी मंजूर करुनही मोगरा नाला रुंदी निधी उपलब्ध करुन न देणे, यामुळे जनतेची प्रचंड गैरसोय होणे, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता” |
| (३४) | ७०० | १० | मुंबई, मालाड पूर्व येथील नागरीकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करण्याकरिता स.का. पाटील रुग्णालयाच्या इमारतीची पुनर्बांधणी करुन रुग्णालय सुरु करण्याकरिता न्यायालयाचा निकाल जलदगतीने लागण्यासाठी शासनाने तातडीने कार्यवाही करणे, तसेच प्रभाग क्र.४१ मधील न.भू.क्र.८२७-ड/४, मौजे मालाड (पूर्व) या महापालिकेच्या भूखंडावर प्रसुतीगृहासह लहान मुलांचे रुग्णालय, स्त्री रोग रुग्णालय चिकित्सा केंद्र, एन.आय.सी.यु. सह प्राथमिक आरोग्य केंद्र व दवाखाना सुरु करणेबाबत महापालिकेतर्फे ३६८६.०३ चौ.मी. क्षेत्राचा राखीव भूखंड सार्वजनिक आरोग्य खात्यास हस्तांतरण करुन या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी मिळाली असून उक्त प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन, निविदा प्रक्रिया राबवून रुग्णालय इमारतीचे बांधकाम सुरु करण्यास शासन व पालिकेकडून होत असलेला विलंब,याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३५) | ७०१ | १० | “मुंबईतील मालाड (पूर्व) दिंडोशी विधासभा क्षेत्रातील आप्पा पाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व मल्टिस्पेशालिटी ओपीडी करिता नविन यंत्र सामुग्री बसविण्यासाठी व आरोग्य ओपीडी आरोग्य केंद्र दवाखान्यात एचबीटी पॉलीक्लिनीक अंतर्गत नेत्ररोग व कान,नाक, घसा तज्ञ यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री पुरवठा करण्याचे पालिका प्रशासनाने आश्वासन देऊनही अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही न करणे, यामुळे रुग्णांची मुलभूत सुविधांसाठी झालेली गैरसोय, येथील अस्वच्छ व दुर्गंधीयुक्त संचालय, सुरक्षा रक्षक नसणे, शुद्ध पिण्याचे पाणी नसणे, औषधांचा वेळेवर पुरवठा न होणे, रुग्णांच्या सोयीसाठी डॉक्टरांच्या वेळा वाढविण्याबाबत दुर्लक्ष होणे, आदि महत्वाच्या समस्या सोडविणेबाबत लोकप्रतिनिधींनी पालकमंत्री, महापालिका आयुक्त यांना दि.२७.०१.२०२५ रोजी लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही न होणे, यामुळे येथील नागरिकांची आरोग्य सोईसुविधा अभावी झालेली व होत असलेली प्रचंड गैरसोय, शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (३६) | ७०२ | १० | "मुंबईतील मालाड (पूर्व), दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील आप्पा पाडा, क्रांती नगर, प्रथमेश नगर, रामनगर, दुर्गानदर टेकडी, तानाजी नगर, बाणडोंगरी, कोकणीपाडा, पठाणवाडी आदि सर्वच भागातील रहिवाशी नागरिकांना गेली ६ महिन्यापासून अत्यंत कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने या ठिकाणी भिषण पाणी टंचाई होऊन व पाण्यासाठी रहिवाश्यांमध्ये आपसात वाद होत असल्याने संतप्त रहिवाश्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या नेतृत्वाखाली महापालिकेच्या पी-पूर्व प्रभाग कार्यालयावर हजारोंच्या संख्येने दि.०६.०१.२०२५ रोजी मोर्चा काढून तीव्र आंदोलन करण्यात येणे, या संदर्भात महापालिका आयुक्त व सहाय्यक महापालिका आयुक्तांना लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर पालिका प्रशासनाने पाणी टंचाईची समस्या सोडविण्यासाठी कोणतीच कार्यवाही न करणे, तसेच अनेक ठिकाणी गढूळ पाणी येत असल्याने नागिरकांना विविध रोगांचे प्रादुर्भाव होण्याचा धोका निर्माण होणे, सदरहू क्षेत्रातील रहिवाशी नागरिकांची पाणी टंचाईची समस्या सोडवून पाणी सुरळीत पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३७) | ६९५ | १०० | मुंबईतील मालाड पूर्व जी.जी.महालकारी मार्ग ते संस्कार कॉलेज दरम्यानच्या १८.३० मीटर या प्रस्तावित (डीपी रोड) नियोजित रस्त्याचे विकासकाम २०० झोपडी धारकांचे त्याच परिसरात पुर्नवसन करुन पुर्ण करण्याचे शासनाने आश्वासन देऊनही अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे दि.०२.०७.२०२५ रोजी निर्दशनास येणे,या संदर्भात सहाय्यक महापालिका पी-उत्तर विभाग यांचे मार्फत २०० झोपडीधारकांचे सर्वेक्षण करुन परिशिष्ट-२ ची यादी तयार करण्याचे काम अनेक वर्षापासून अद्यापपर्यंत प्रलंबित असणे, झोपडीधारकांचे त्याच परिसरात पुर्नवसन करणेबाबतची कार्यवाही करण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळेच १८.३० मीटर रस्त्याचे काम अद्यापपर्यंत पुर्ण होऊ न शकणे, या विषयासंदर्भात या आधीही महाराष्ट्र विधानसभागृहात लक्षवेधी सुचनेच्या माध्यमातून उपस्थित केलेल्या चर्चेत नगरविकास मंत्री महोदयांनी बाधीत झोपडयांचे पुर्नवसन करुन रस्त्याचे काम तातडीने सुरु करण्याचे आश्वासन देऊनही यावर कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, यासंदर्भात मा. पालकमंत्री, मा. महापालिका आयुक्त यांना २१.०१.२०२५ रोजी लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याने परिणामी मालाडपुर्व परिसरातील स्थानिक जनतेस वाहतूक कोंडीमुळे गैरसोय होऊन त्रासदायक ठरत असणे, याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. गजानन लवटे** |
| (३८) | ८१४ | १०० | दर्यापूर नगर परिषदेचे हद्दवाढ महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाच्या दि. २९ जून २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आले आहे. हद्द वाढ होण्यापूर्वी दर्यापूर नगरपरिषद क्षेत्राचे क्षेत्रफळ ४.१४ चौ.की.मी. एवढे होते. मात्र |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | हद्द वाढीनंतर ते ११.२७ चौ.की.मी एवढे झाले आहे. तसेच सन-२०११ च्या जनगणनेनुसार पूर्वी लोकसंख्या ३६३६३ एवढी होती. मात्र हद्दवाढीनंतर ती ४६७७२ झाली आहे. मात्र हद्दवाढ झालेले क्षेत्र हे पूर्वी ग्रामीण भागात असल्याने त्या ठिकाणी आवश्यक नागरिक सोयी सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे या भागात सांडपाण्याची समस्या असून नागरिकांच्या वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत व नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. तसेच जाण्या-येण्याकरिता रस्त्यांची सुविधा नसल्यामुळे पावसाळयात जाणे येण्याची देखील मोठ्या समस्या निर्माण होत आहेत. तसेच या भागात विद्युत पोल व लाईटची व्यवस्था नसल्यामुळे रात्रीच्या वेळी मोठी समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे सन २०२१ मध्ये दर्यापूर नगरपरिषदेची हद्दवाढ होऊन ४ वर्षाचा कालावधी झाल्यानंतर सुद्धा आवश्यक सोयी सुविधाकरिता निधी उपलब्ध करून देण्याकरिता शासनाचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३९) | ८१५ | १०० | अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेचे सन-२०१६ मध्ये हद्दवाढ करण्यात आली होती. या हद्द वाढीनुसार नव्याने समाविष्ट क्षेत्र ७.६० चौ.कि.मी. असून पूर्वीपेक्षा ते दीडपटीने वाढलेले आहे. यामुळे नव्याने समाविष्ट क्षेत्रातील विकास कामाचा नगरपरिषदेवर मोठ्या प्रमाणात भार वाढलेला आहे. त्यातच गेल्या चार वर्षात नगरपरिषदेला कोणत्याही प्रकारचा निधी मिळाला नसल्यामुळे अनेक विकास कामे प्रलंबित आहेत. नगरपरिषद क्षेत्रातील विविध विकास कामांकरिता तसेच नगरपरिषेत्रातील मोठे नाले व गटारे इत्यादी काम करणेकरता नगर परिषदेने प्रस्तावित केले आहे. या बांधकामांकरिता देखील आवश्यक निधी अद्याप पर्यंत उपलब्ध झालेला नाही. त्याचबरोबर अंजनगाव सुर्जी शहरातील प्रशासकीय नगरपरिषदेची प्रशासकीय इमारत सांस्कृतिक भवन असलेल्या जागेत आहे. त्यामुळे नगरपरिषदेने प्रशासकीय इमारतीसाठी मौजा - शहापुरा क्र. ४५/२ ब येथील उपलब्ध जागेमध्ये प्रशासकीय इमारत बांधणेचे नियोजित करण्यात आले असणे, सदरचा कामाकरिता निधी उपलब्ध करून देण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (४०) | ८२५ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषद व सावली आणि सिंदेवाही नगरपंचायत अंतर्गत शहरातील अनेक प्रभागात स्ट्रिट लाईट नसल्याने व काही ठिकाणी कमी स्ट्रिट लाईट असल्याने नागरिकांना माणसिक त्रास सहण करावा लागणे, या करीता अत्याधुनिक असे नवीन स्ट्रिट लाईट लावण्यासाठी नागरिकांनी मागणी करणे, निधी अभावी ही कामे करण्यासाठी करणे अडचणी निर्माण होत असल्यामुळे निधी अभावी सदर काम करता येत नसल्याने नागरिकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषद व सावली आणि सिंदेवाही नगरपंचायत अंतर्गत सर्व प्रभागामध्ये प्रभागात स्ट्रिट लाईट लावणे व त्यासाठी विघुतीकरण करणे या विकास कामासाठी निधीची आवश्यकता |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | असल्याने नगरपरिषदांना वैशिष्टयपुर्ण कामासाठी विशेष अनुदान कार्यक्रम या योजनेअंतर्गत ब्रम्हपूरी नगरपरिषद व सावली आणि सिंदेवाही नगरपंचायत अंतर्गत सर्व प्रभागात स्ट्रिट लाईट लावणे व त्यासाठी विघुतीकरण करणे या कामासाठी निधी मंजूर करून तिनही नगरपरिषद/नगरपंचायतला उपल्बध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४१) | ८२६ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही नगरपरिषदे अंतर्गत शहरातील अनेक प्रभागात सिमेंट क्राँकीट रस्ते, गटर लाईन, बगिचा, चौकाचे सौंदर्यीकरण, शहरात असलेल्या तलावाचे सौदर्यीकरण, वनिकरण, क्रिडागणाचा विकास, वाचनालय, प्रत्येक प्रभागात स्वच्छालयाचे बांधकाम इत्यादी कामे करणे अत्यांत आवश्यक असणे, निधी अभावी करण्यासाठी ही कामे करणे अडचणी निर्माण होणे, विकासाच्या दृष्टीने विकासाची कामे करण्याची मागणी नागरिकांनी करून सुध्दा निधी अभावी सदर काम करता येत नसल्यामुळे नागरिकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही नगरपरिषदे अंतर्गत सर्व प्रभागामध्ये सिमेंट क्राँकीट रस्ते, गटर लाईन, बगिचा, चौकाचे सौंदर्यीकरण, शहरात असलेल्या तलावाचे सौदर्यीकरण, वनिकरण, क्रिडागणाचा विकास, वाचनालय, प्रत्येक प्रभागात स्वच्छालयाचे बांधकाम इत्यादी विकास कामे करण्यासाठी कोटीच्या निधीची आवश्यकता असल्याने नगरपरिषदांना वैशिष्टयपुर्ण कामासाठी विशेष अनुदान कार्यक्रम या योजनेअंतर्गत सदर विकासकामे मंजूर करून त्यासाठी निधी मंजूर करून सिंदेवाही नगरपरिषदेला उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (४२) | ८२७ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सावली नगरपरिषद अंतर्गत शहरातील अनेक प्रभागात सिमेंट क्राँकीट रस्ते, गटर लाईन, बगिचा, चौकाचे सौंदर्यीकरण, शहरात असलेल्या तलावाचे सौदर्यीकरण, वनिकरण, क्रिंडागणाचा विकास, वाचनालय, प्रत्येक प्रभागात स्वच्छालयाचे बांधकाम इत्यादी कामे करणे अत्यांत आवश्यक असणे, निधी अभावी करण्यासाठी ही कामे करणे अडचणी निर्माण होणे, विकासाच्या दृष्टीने विकासाची कामे करण्याची मागणी नागरिकांनी करून सुध्दा निधी अभावी सदर काम करता येत नसल्यामुळे नागरिकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील सावली नगरपरिषदेअंतर्गत सर्व प्रभागामध्ये सिमेंट क्राँकीट रस्ते, गटर लाईन, बगिचा, चौकाचे सौंदर्यीकरण, शहरात असलेल्या तलावाचे सौदर्यीकरण, वनिकरण, क्रिडागणाचा विकास, वाचनालय, प्रत्येक प्रभागात स्वच्छालयाचे बांधकाम इत्यादी विकास कामे करण्यासाठी निधीची आवश्यकता असल्याने नगरपरिषदांना वैशिष्टयपुर्ण कामासाठी विशेष अनुदान कार्यक्रम या योजनेअंतर्गत सदर विकासकामे मंजूर करून त्यासाठी निधी मंजूर करून सावली नगरपरिषदेला उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. रईस शेख** |
| (४३) | ७२८ | १०० | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रामधील धोकादायक व जुन्या / मोडकळीस आलेल्या इमारतीचा समुह विकास पध्दतीने पुर्नविकासास शिघ्रगतीने चालना मिळण्याकरिता एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र १४.८.१ मध्ये दाटीवाटीच्या बाहेरील (Non Congested Area ) क्षेत्रासाठी ४००० चौ.मी. क्षेत्र व दाटीवाटीच्या क्षेत्रासाठी (Congested Area ) २००० चौ.मी. क्षेत्र अनुज्ञेय करण्याकरिता शिथिलता आणण्याची आवश्यकता, तसेच विशेष तरतुद करण्याबाबत शासननाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४४) | ७३० | १०० | भिंवडी परिसर अधसूिचित क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेअतर्गत भिवंडी ते ठाणेपर्यत महानगरपालिकेच्या पाईप लाईनच्या वरील जमिनीवर रस्ता प्रस्तावित करण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास आदेश करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधीनी दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केलेला पत्रव्यवहार,पत्राच्या अनुषंगाने अदयाप कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४५) | ७३६ | १०० | भिवंडी निजामपुर शहर महागनरपालिका कार्यक्षेत्रात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा -२ अंतर्गत मल:वाहिनी घालण्याच्या प्रकल्पाच्या कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याने कामाची पाहणी करुन नव्याने अहवाल तयार करुन नविन योजना राबविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी संबंधिताकडे पत्रव्यवहार करुन केलेली मागणी, कामाची पाहणी करुन नव्याने अहवाल तयार करुन नविन योजना राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. वरुण सरदेसाई** |
| (४६) | ८४० | १०० | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एच पूर्व विभागाच्या वांद्रे (पूर्व), खार (पूर्व) व सांताक्रूझ (पूर्व) विभागातील अत्यंत महत्वाच्या कामांकरिता निधीची आवश्यकता, अंतर्गत रस्ते अस्फाल्ट मास्टिक पद्धतीने करण्याची आवश्यकता, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एच पूर्व विभागामधील प्रस्तावित AW-293 यादीमधील मायनर रस्ते अत्यंत खराब अवस्थेमध्ये असल्याने निधीची आवश्यकता याबाबत शासनाने महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सुखसोयींच्या विकासासाठी आणि वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी केलेल्या तरतुदीमधून वरील नमूद कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४७) | ८४१ | १०० | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एच (पूर्व) विभागामध्ये चालू असलेले मेजर रस्त्यांची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची चालू असणे, या मेजर रस्त्यांच्या सांताक्रूझ (पूर्व) येथील चालू असलेल्या रस्त्यांच्या पादचारी मार्गास निधीची तरतूद केलेली नसणे, यामुळे एच पूर्व विभागातील चालू असलेल्या मेजर रस्त्यांच्या कामासोबत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | ड्रेनेज सिस्टीम आणि पादचारी मार्गांच्या उभारणीकरीता महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सुखसोयींच्या विकासासाठी आणि वैशिष्ट्यपूर्ण कामांकरिता तरतूद केलेल्या निधीमधून वरील नमूद कामांस निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ९ जुलै, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) नगर विकास विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई